
# 2019-20

| Sr. No. | Name ofthe teacher | Title of the book / chapters published | Title of the paper | | ISBN number ofthe proceeding | Affiliating Institute atthe time of publication | Name of the publisher |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Dr. Mokashi S.A. | Mulkha Vegali Manase | Dadasaheb Vastad | दादासाहेब वस्ताद | 978-93-85190-19-3 | Arts and Commerce College, Mayani | Kulsachiv Shivaji University Kolhapur |
| 2 | Dr. MirajkarS.B. | Vyaktimatva Vikas Ani Bhashik Koushalya | Shravan Koushyalya Ani Vyaktimatv Vikas | श्रवण कौशल्य आणि व्यक्तीमत्व विकास | 978-93-85127-31-1 | Arts and Commerce College, Mayani | Darya Prakashan |
| 3 | Dr. MirajkarS.B. | Preface | Karmveer Bhaurao Patil | कमवीरभाऊराव पाटील | 978-93-82451-74-07 | Arts and Commerce College, Mayani | Naga-Nalanda Prakashan Islampur |
| 4 | Dr. Mokashi S.A. | बदलत्य ग्राम संस्कृतीचा वेध | nvya kthecha sangava | नव्या कथेचा सांगावा | 978-81-944604-2-8 | Arts and Commerce College, Mayani | Tejashri Prakashan |
| 5 | Dr. Mokashi S.A. | Vednancha Hunkar | Krushimanachya Kondmaryacha prbhavi vedna avishkar | धुसमट: कृषीमनाच्या कोंडमाऱ्याचा प्रभावी वेदनाविष्कार | 978-938-81831-79-3 | Arts and Commerce College, Mayani | Gavali Prakashan Islampur |


मुलखावेगळी माणसं
• संपादक •
डॉ. दत्ता पाटील
डॉ. सुभाष जाधव
डॉ. प्रभाकर पवार

मुलखावेगळी माणसं : बी. ए. भाग – तीन, विद्याशाखीय विशेष निवड
(अभ्यासपत्रिका क्र. १६, DSE - E130)

प्रकाशक : डॉ. व्ही. डी. नांदवडेकर,
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

© सर्व हक्क प्रकाशकाधीन

ISBN : 978-93-85190-19-3

प्रती : २,५००

मुद्रक : श्री. भूषण पाटील,
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर – ४१६००४.

प्रथम आवृत्ती : जून, २०२०

मुखपृष्ठरचना : शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय, कोल्हापूर

मूल्य : रु. ८५/–

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| भूमिका | डॉ. दत्ता पाटील | |
| प्रस्तावना | डॉ. सोमनाथ कोमरपंत | |
| १. रामा मैलकुली | व्यंकटेश माडगूळकर | १ |
| २. मृत्यूचे चुंबन घेणारा महाकवी | प्र. के. अत्रे | १० |
| ३. निळू मांग | अण्णाभाऊ साठे | २१ |
| ४. मोरणी | विभावरी शिरूरकर | ३२ |
| ५. जमीला जावद | हमीद दलवाई | ४० |
| ६. यंकटअण्णा | व. वा. बोधे | ६२ |
| ७. दगडूमामा | उत्तम कांबळे | ७२ |
| ८. मुंबईचा चित्रकार | अरुण खोपकर | ८२ |
| ९. हिरा | इंद्रजित भालेराव | ९४ |
| १०. बाबा मास्तर | दि. बा. पाटील | १०३ |
| ११. दादासाहेब वस्ताद | सयाजीराजे मोकाशी | ११२ |
| १२. डोकेवाला संशोधक : दादाजी रामजी खोब्रागडे | व्ही. एन. शिंदे | ११९ |

# दादासाहेब वस्ताद

– सयाजीराजे मोकाशी

---

आज दसरा, सोनं लुटायचा दिवस. सकाळी पूजा, देवदर्शन, शस्त्रपूजा झाली. दुपारी जेवणं झाल्यावर, दिवस कलल्यावर नाथबाबाच्या देवळाजवळ माणसं जमायला लागली. वरली आळी, खालची आळी, वाडी, मळा, शिवंच शेत सगळ्या बाजूंनी माणसं गोळा होऊ लागली. घटका दोन घटकांनी सोनं लुटायचं म्हणून सगळी माणसं गोळा होऊ लागली. तवर एकच दंगा झाला. 'रामू पैलवानला मारलं, पळा पळा' सगळी माणसं बावरून हुड्यावर पळत सुटली.

भगवा पटका गुंडलेला, ठेवणीतला सदरा अंगात घातलेला पैलवान रामू रक्तानं उभा न्हाला होता. डोक्यात त्याच्या मधोमध कुऱ्हाडीचा घाव बसला होता. तो थोडा भेलकांडला. डाव्या काखेत डोईचा पटका घेऊन डोक्याची दोन्ही भकलं रामूनं हातानं जाम धरली अन् हळूहळू वाड्याकडं आला. पायऱ्या चढून भव्य वाड्याच्या ढेलजेत खांबाला टेकला. लोक गोळा झाले. घरात रडारड सुरू झाली. रामूचे थोरले भाऊ दादा वस्ताद यांना समजल्याबरोबर ते धावत तेथे आले.

रामूचं बोलणं बंद झाले अन् मान डाव्या खांद्यावर कलली. वाड्यात एकच गोंधळ उडाला. दादा वस्ताद रामूच्या गळ्यात पडून रड रड रडले. अन् एका झिटीत उठले. घरातली फरशी कुऱ्हाड हातात घेऊन डोईला टापरी बांधून म्हणाले,

"कुणी मारले माझ्या भावाला? त्याचं नाव सांगा मला; बघतो त्याचं."

पण सगळेजण गप्प, कुणीच बोलेना. मग धाकटा नाना म्हणाला, "वरल्या आळीचा धोंडी"

वस्ताद पाच-पंचवीस तालमीतली पोरं घेऊन त्याचा पाठलाग करू लागले. पण तो तामजाईच्या डोंगरात दडून बसला. जंगजंग पछाडला पण तो सापडला नाही. वस्ताद परत आले. रामूवर अंत्यसंस्कार केले. जमलेली माणसं पांगली. रामू वाड्यात अन् गावात मोठं दुःख ठेवून गेला. हळूहळू लोक कुचकुचू लागले. बायका पदराआड तोंड लपवून बोलू लागल्या.

"आवं व्हंजी, रामूला कुणी मारू शकला नसता, पण फसवून त्याचा काटा काढला."

"ते कसा?"

"रामू शंकर अण्णाच्यात दत्तक घातला म्हणून बाकीच्याला राग आला. अन् कारस्थानी त्यो बाबा हाय की तरण्या पोरास्नी फितवायला."

"कोण त्यो?"

"त्यो शिरू काका. त्येनंच हे कारस्थान रचलं अन् त्यात रामू बळी गेला."

गावात, घरात, रानात हीच चर्चा सुरू झाली. धोंडी अस्तखाल पळून गेला. नेमानेमी गांधीजींची हत्या झाली. वस्तादला नेमकी संधी धावून आली. तालमीतली पाच-पन्नास पोरं घेऊन शिरूकाकाला आत कोंडून, दिला वाडा पेटवून.

पुढे अनेक दिवस तारखा पडल्या. सगळे निर्दोष सुटले. पंत सरकार म्हणाले, "वस्ताद आता मागचं सगळं विसरा. या नव्या पोरांना नवी दिशा द्या. रागापेक्षा संयमाने जगायला शिकवा. साऱ्या समाजाचा फायदा होईल."

वस्तादने हे मनावर घेतलं अन् या पुढचं आयुष्य समाजासाठी वाहून द्यायचं ठरविलं.

दादा वस्ताद दिसायला गोरेपान, भरलेली शरीरयष्टी, भरदार मिशा, डोईवर डाळिंबी रंगाचा रेशमी फेटा. अंगात काव लावलेला तांबडा सदरा, पायघोळ धोतर, नजर भेदक, रागावले तर लालबुंद होत. अंगात अचाट ताकद, शरीर व्यायामाने कमावलेले. गावोगांवच्या फडात हमखास कुस्ती करणारा पैलवान म्हणून ख्याती. अन् कुस्त्याचा फड मोडताना वस्ताद पुंड्या ऊस पिळून रस काढत. हे बघून बघे लोक गप्प होत व वस्तादाच्या ताकदीचे कौतुक करीत घरी परतत. मग डफडं पिपाणी वाजत-गाजत पंच मंडळी देवळाकडं येत. ग्रामदैवताचं चांगभलं गाजवून खिरीचा प्रसाद खाऊन, रातचा तमाशा उभा राहत असे.

वस्ताद नावाने ओळखले जाणारे 'दादा' इनामदार घराण्यातले होते. दक्षिणमुखी वळणाऱ्या बेलवण नदीच्या उंच अकटावर दादांचा एकराएवढा मोठा वाडा. चारी बाजूला बुरूज. मोठाले दगड. तटावरून बैलगाडी जाईल एवढ्या रुंदीचा बाजूचा तट. वाड्याचा मोठा दरवाजा. गायी-वासरांनी भरलेला गोठा. राबणारे गडी. जवळच तालीम. शंभर एक पोरं रोज पहाटेपासून त्या तालमीत घुमत. वस्ताद पहाटे उठून पोरांना खेळवीत. डाव शिकवीत, व्यायामाचे नवनवे प्रकार करून दाखवत. स्वतः व्यायाम करून, तालमीत चार पकडी धरून, मग नदीवर आंघोळीला जात. रोज पहाटे नदीवर जाताना गावातील लोक पाण्याशिवायच प्रातर्विधीला जात हे वस्तादना नेहमी खटके. एक दिवस त्यांनी एक योजना आखली, कुंभाराच्या घरातून दहा-वीस मडकी आणली. नदीतून ती भरून, जो पाणी न घेता कासोटा सोडून जीव मोकळा करायला चवड्यावर बसला आहे. त्याच्याजवळ ते मडके ते ठेवत. त्याचा परिणाम असा झाला की लोक रोज पाणी घेऊन जाऊ लागले. खजील झालेले लोक ही गोष्ट कोणाजवळ कधीच बोलले नाहीत. एरव्ही वस्तादांना पाहिले तर लाजत, गप्प होत.

त्यांच्या वाड्यावर रोज गोर-गरिबांचा मोठा राबता असे. कुणाचे धान्य संपले, कुणाला नांगर तर कुणाला सांभाळायला कालवड पाहिजे असे. ते कुणालाच नाही म्हणत नसत. कुणाचं पोर शिकायला शहरात निघालं. कुणाची मुलगी नांदायला निघाली की ते हटकून वाड्याच्या पायऱ्या चढत. वस्तादाच्या माईच्या पाया पडत. त्यांना पैशाची अडचण आहे का तेही विचारत.

वस्ताद म्हणत, "हे सारं वैभव माझ्या वाडवडिलांचं आहे. त्यांनी मला गोर-गरिबांना वाटायला सांगितलं आहे. हे सारं तुमचंच आहे, मी आपला हे सांभाळणारा कारभारी आहे."

वाड्यात खूप मोठं उंबराचं झाड. शेवगा, आंबा, बेल, कडुलिंब, पारिजातक आणि जांभळ ही झाडं. एका पावसाळ्यात उंबराची फळं खायला एक लेकुरवाळी वानरीन एकटीच आली. तिचा कळप भिऊन परागंदा झाला. तिचं पिलू तिच्या छातीला कायम चिकटलेलं. ते नर होतं. म्हणून वस्तादांनी त्यांची नावं भागी-नाऱ्या असं ठेवलं. सकाळी सकाळी शिळं अन्न खायला माय-लेकरं येत. माई त्यांना पोटभर टाकत. घरच्या माणसावानी त्यांची ऊठबस होई. पुढं पुढं ती माणसाळली. वाड्यात खुशाल हिंडू-फिरू लागली.

वस्तादांची वडिलार्जित मोठी जमीन. त्या इनामातून मधूनच पंढरपूरला रेल्वे जाई. तिला 'देवाची गाडी' म्हणत. एक साल तिथं ऊस लावला. भरमसाठ वाढला. माघवारी सुरू झाली. वस्तादनी दहा-वीस पैलवानांना एकत्र करून, काव लावलेलं तांबडं खांद्यावरील धोतर रेल्वे रुळावरून उभा राहून दाखवलं, अन् रेल्वेने गती कमी केली, गाडी थांबली. हिंदी बोलणाऱ्या ड्रायव्हरला वस्ताद मराठीत बोलले. "तुम्ही सगळीजण पंढरीला वारीला निघालाय. माझ्या शेतातला रस अन् ऊस घ्या. सगळ्या वारकऱ्यांना रस पिऊ द्या, ही माझी विनंती आहे."

गाडी दहा मिनिटं थांबली. सगळ्यांना जमेल तसं रसपाणी दिलं. अन् गाडीनं शीळ दिली. धूर सोडत गाडी डोंगराआड झाली. वस्तादना आनंद झाला. मग पोरं माघारी फिरली.

वर्षातून चार-पाच महिने वस्ताद गावोगांवचे कुस्त्यांचे फड करीत पोरांना घेऊन पूर्वेला पुसद, यवतमाळपर्यंत जात. कधी मुधोळ, तंजावर, बेल्लारीला तर कधी देवास, कोटा, ग्वाल्हेरला. एकदा वस्ताद पुसदच्या तालमीत पोरांना शिकवायला राहिले. मागे गावाकडे माई आजारी पडल्या. खानापूरचा डागदार आला. तपासणी करताना माईंना म्हणाला, "बाई नाडी तपासायची आहे तुमची, हात द्या जरा."

करा. नाथबाबा तुम्हाला यश देईल.''


वस्तादांना ना मूल ना बाळ. माई अगोदरच गेलेल्या. ते एकटे राहत. कुणी वाड्याच्या पायऱ्या चढून वर आले तर बोलत. जुन्या गोष्टी घडत. ते आणखी थकले. एका तिन्ही सांजेला दादा वस्तादांनी आपला देह उंबराच्या झाडाखाली ठेवला. वाड्याचा शेंडा ढासळला. अन् बुरुजाची माती खचली.

आजही तो वाडा दादा वस्तादांची आठवण सांगत बसतो. कुणी म्हणतं, ''या वाड्यात वस्ताद आजही वास करतात.'' लोक म्हणतात, ''एक देवमाणूस गेला. राजासारखा वागला, जगला आणि माणसांच्या काळजात ठसला.''

.... आता या वाड्यात व्यायामशाळेऐवजी कन्याशाळा भरते, वस्तादांच्या नावाने!

('पंधरा ऑगस्ट' मधून)

❑❑❑



# व्यक्तिमत्त्व विकास आणि भाषिक कौशल्ये

संपादक
नीला जोशी

# अनुक्रम


संपादकीय ........................................ ५

१. बीजभाषण/राजन गवस ........................................ १५

२. भाषिक कौशल्ये आणि व्यक्तिमत्त्व विकास/नंदकुमार मोरे ........... २६

३. श्रवण कौशल्य आणि व्यक्तिमत्त्व विकास/
श्यामसुंदर मिरजकर ........................................ ३५

४. श्रवण कौशल्य एक जीवन कौशल्य/महेश गायकवाड ............... ४३

५. श्रवण कौशल्य आणि व्यक्तिमत्त्व विकास/राजेश पाटील ............ ५९

६. वाचनकौशल्य : संपन्न व्यक्तिमत्त्व विकासाची पाऊलवाट/
रणधीर शिंदे ........................................ ६६

७. साहित्याचे वाचन आणि व्यक्तिमत्त्व विकास/शोभा नाईक .......... ७५

८. अभिवाचनाचे अवतार/रमेश साळुंखे ........................... १००

९. अभिवाचन : पूर्वतयारी आणि तत्त्वे/तातोबा बदामे ............... ११३

१०. लेखन कौशल्ये/मानसी लाटकर ................................ १२१

११. सर्जनशील लेखन आणि व्यक्तिमत्त्व विकास/रफीक सूरज .......... १३२

१२. लेखन कौशल्य आणि व्यक्तिमत्त्व विकास/गीता गवस ............ १३९

१३. चित्रपट : सर्जनशील कलाप्रकार/तेजस चव्हाण .................... १६१

१४. भाषण कौशल्य आणि व्यक्तिमत्त्व विकास/एकनाथ पाटील ........ १७३

१५. संवाद कौशल्य आणि व्यक्तिमत्त्व विकास
यातील सहसंबंध/अनीश जोशी ................................ १८७

१६. कविता सादरीकरण/श्रद्धा पाटील ................................ १९२

१७. कुस्ती निवेदन : एक भाषिक कौशल्य/मतीन शेख ................ १९७

१८. प्राण्यांची देहबोली/दत्ता मोरसे .................................. २०२

१९. विषय सूची ................................................ २०९

# श्रवण कौशल्य आणि व्यक्तिमत्त्व विकास

**श्यामसुंदर मिरजकर**


व्यक्तिमत्त्व विकास हा आज परवलीचा शब्द झाला आहे. व्यक्तिमत्त्वात व्यक्तीचे बाह्यदर्शन आणि त्याच्या आंतरिक क्षमता यांना महत्त्व असते. आंतरिक क्षमतांच्या जडणघडणीत म्हणजेच पर्यायाने व्यक्तिमत्त्व विकासात भाषेचे स्थान अनन्यसाधारण आहे. भाषा ही माणसाने निर्माण केलेली अभूतपूर्व संरचना! मानवी विकासात भाषेला मैलाचा दगड मानता येईल. भाषांची निर्मिती आणि लिपींचा शोध यामुळे माणूस वेगाने प्रगती करू लागला. त्याने स्वतःचे वैशिष्ट्यपूर्ण जीवनमान विकसित केले. त्यामुळेच मानवी जीवनात भाषेला प्रचंड महत्त्व असलेले दिसते. भाषा शिकणे किंवा आत्मसात करणे म्हणजे भाषिक कौशल्यांचा विकास करणे होय. व्यक्तीने स्वतःमध्ये भाषिक कौशल्ये विकसित केल्यानंतर आपोआपच त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो. त्याचे व्यक्तिमत्त्व प्रभावी होऊ लागते.

श्रवण, भाषण, वाचन, लेखन व संभाषण ही भाषिक कौशल्ये मानली जातात. या भाषिक कौशल्यांचा विकास साधून व्यक्ती स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण करत राहते. श्रवण हे पहिले महत्त्वाचे भाषिक कौशल्य आहे. हे पायाभूत कौशल्य आकलनाशी संबंधित आहे. ऐकणे (hearing) आणि श्रवण (listening) या दोन क्रियांमध्ये मूलभूत फरक आहे. कानावर पडणारे सर्व ध्वनी, सर्व आवाज आपणास ऐकू येतात. मात्र त्यातील काही ध्वनीच आपण लक्षपूर्वक ऐकतो. आसपासचे सर्व ध्वनी कर्णेंद्रियाद्वारे जाणवणे म्हणजे ऐकणे

# कर्मवीर भाऊराव पाटील

## निर्माणाचे डोंगर आणि अनवाणी पाय

सिराज बाबालाल मोमीन



नाग-नालंदा प्रकाशन

## प्रस्तावना

बहुजनांच्या जीवनातील सर्व प्रकारच्या अनर्थांचे मूळ हे अविद्येत आहे. त्यामुळेच स्त्रीशूद्रातिशूद्रांच्या शिक्षणासाठी झटले पाहिजे, आग्रही राहिले पाहिजे अशी मांडणी सर्वप्रथम क्रांतिबा जोतीराव फुलेंनी केली. इतकेच नव्हे तर क्रांतिमाता सावित्रीबाई फुलेंच्या साहाय्याने ज्ञानाचा प्रकाश स्त्रीशूद्रांच्या जीवनात पोहोचावा यासाठी अथक प्रयत्न केले. तोच वसा-वारसा कोल्हापूर संस्थानात राजर्षी शाहूंनी चालविला. प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले. विद्यार्थ्यांसाठी अनेक बोर्डिंग सुरू केले. त्यामुळे कोल्हापूर हे प्रागतिक विचारांचे व चळवळींचे केंद्र बनले.

या शाहू महाराजांच्या तालमीत तयार झालेले एक उमदे व बंडखोर व्यक्तिमत्त्व म्हणजे भाऊराव पायगोंडा पाटील! सत्यशोधक विचारांचा वारसा आणि राजर्षींचा आदर्श मनामध्ये घेऊन त्यांनी वयाच्या ३२ व्या वर्षी काले (जि. सातारा) येथे रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. पुढचे अवघे जीवन खेड्यापाड्यात संस्थेच्या शाखा शाळा सुरू करण्यात आणि त्यांची व्यवस्था लावण्यात खर्चले. दीनदलितांचा उद्धार करणारी ज्ञानगंगा गरिबांच्या झोपडीपर्यंत पोहोचली पाहिजे यासाठी अविरतपणे चाळीस वर्षे झटणारे भाऊराव हेच खरे कर्मवीर! त्यांच्यामुळेच खेड्यापाड्यातील शेतकऱ्यांची मुले, दीनदलितांची मुले शिकली, नोकरदार झाली, आत्मनिर्भर झाली.

भाऊरावांचे कार्य शिक्षणापुरतेच सीमित होते असे नव्हे, तर समतेचा आणि अंधश्रद्धा निर्मूलनाचा जिताजागता आदर्श ते होते. जातिभेदाला त्यांच्या



ठायी थारा नव्हता. माधुकरी मागण्याची भिक्षुकी मान्य नव्हती. त्यामुळेच 'कमवा अन् शिका' हा मूलमंत्र त्यांनी दिला. स्वावलंबी शिक्षणाला प्रोत्साहन दिले. परिणामी स्वातंत्र्योत्तर कालखंडात महाराष्ट्रात शेतकरी-कष्टकरी यांची मुले 'साहेब' होऊ शकली.

रयत शिक्षण संस्थेच्या शाळा म्हणजे पुरोगामी विचारांची संस्कार केंद्रे! त्यामुळे अवघा महाराष्ट्र घडला. विद्यार्थी घडले. शिक्षक घडले. असेच रयत संस्कारात व परिवर्तनवादी चळवळीत घडलेले एक व्यक्तिमत्त्व म्हणजे कवी सिराज बाबालाल मोमीन! कर्मवीर अण्णांच्या जीवनाचा लेखाजोखा मांडणारी अनेक चरित्रे उपलब्ध आहेत. परंतु तरीही मोमीन सरांना अण्णांबद्दल लिहावे वाटले हे अण्णांच्या बहुपेडी, अस्पर्शित चरित्राचे गमक आहे. आजच्या भयावह वर्तमानकाळात अण्णा दीपस्तंभासारखे ठामपणे उभे आहेत. योग्य दिशा दाखवत आहेत. जातीच्या, धर्माच्या अस्मिता टोकदार होण्याचा हा काळ उन्मादी धर्मकेंद्री राजकारणास पोषक आहे. अशा काळात अण्णा आपल्यात हवे होते. किमान त्यांचे विचार घराघरात पोहोचायला, जागवायला हवे, या तळमळीतून सिराज मोमीन यांनी हे लेखन केले आहे. एका संवेदनशील कवीने कर्मवीरांच्या जीवनगाथेची केलेली पुनर्मांडणी म्हणून हे लेखन मौलिक आहे. समकालीन संदर्भासह अण्णांचे जीवनकार्य समजून घेण्यास प्रस्तुत लेखन उपयुक्त ठरणारे आहे. प्रसंगचित्रणातील लेखकाची हातोटी उल्लेखनीय आहे. अनेक प्रसंगाच्या माध्यमातून साकारलेले कोलाज असे या लेखनाचे स्वरूप आहे. लेखक फक्त चरित्र सांगत नाही, तर वर्तमानातील अनेक प्रश्नचिन्हे आपल्यासमोर उभी करतो. समकालीन वास्तवावर चिंतन करायला भाग पाडतो. हेच सिराज मोमीन यांचे यश आहे! त्यांच्या लेखनाचे मन:पूर्वक स्वागत!

**डॉ. श्यामसुंदर मिरजकर**

# बदलत्या ग्रामसंस्कृतीचा वेध




संपादन

डॉ.श्रीकांत पाटील

■ सांगावा : बदलत्या ग्रामसंस्कृतीचा वेध

Sangava : Badltya Gramsnskruticha vedh

■ संपादन : डॉ. श्रीकांत श्रीपती पाटील

मु. पो. घुणकी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

पिन कोड ४१६ ११२, मोबा. ९८३४३४२१२४.

© राजेश वसंत पाटील, कर्नाळ, जि. सांगली.

■ प्रकाशक : तेजश्री प्रकाशन

दादासाहेब काका जगदाळे, मोबा. ८२७५६३८३९६

महालिंग मळा, यशवंत कॉलनीजवळ कबनूर,

ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर - ४१६ १३८.

■ प्रमुख वितरक

अक्षरविश्व पुस्तकालय

डांगे चौक, पुणे ३३. मोबा. ९७६४५७९७२२.

■ मुखपृष्ठ : कोंदन प्रिंटसेट मिडिया

■ अक्षरजुळवणी : श्री. आनंदा टकले

■ मुद्रक : भारती मुद्रणालय, कोल्हापूर

■ प्रथम आवृत्ती : ११ डिसेंबर २०१९

ISBN : 978-81-944604-2-8

■ मूल्य : २०० रुपये.

# अनुक्रम


१. सशक्त कथासंग्रह : सांगावा - योगीराज वाघमारे........................................१३

२. बदलत्या ग्रामसंस्कृतीचा वेध : सांगावा - डॉ. शहाजी पाटील..............................१९

३. जागतिकीकरणाच्या परिणामांना साकारणारा कथासंग्रह : सांगावा

- प्रा. डॉ. शिवाजी नागरे......................................................................३६

४. नव्या कथेचा 'सांगावा' - प्राचार्य डॉ. सयाजीराजे मोकाशी.......................................४०

५. नातेसंबंध घट्ट करणारा 'सांगावा'- भारत चिंतामणी बंडगर ....................................४५

६. गाव-खेड्यातील गोतावळा : सांगावा - महादेव बी. बुरुटे.........................................५२

७. मोलाचा ठेवा 'सांगावा' - प्रा. राजा माळगी......................................................५७

८. ग्रामसंस्कृतीचे वास्तव वर्तमान : सांगावा - हिंमत पाटील........................................५८

९. काळ्या आईचा हुंकार : राजेंद्र भोसले..............................................................६४

१०. कसदार ग्रामीण कथासंग्रह : सांगावा - दि. बा. पाटील.........................................७२

११. बदलत्या समाजव्यवस्थेचे आक्रंदन मांडणाऱ्या कृषीकेंद्रीत कथा : सांगावा

प्रकाश साखरे.......................................................................................७३

१२. 'सांगावा' कथासंग्रहातील प्राणीविश्व - प्रा. प्रदीप राठोड.......................................७७

१३. एक अमूल्य ठेवा 'सांगावा' - हरिश्चंद्र पाटील.....................................................८४

१४. ग्रामीण लोकजीवनाचा दस्तऐवज : सांगावा - गौतम कांबळे.....................................८७

१५. आईचं प्रेम : सांगावा - कल्लाप्पा जोतिबा पाटील..................................................९०

१६. ग्रामसंस्कृतीचा सखोल धांडोळा : सांगावा - काशीनाथ गवळी....................................९४

१७. 'सांगावा'च आला माझ्या भेटीला - अरुण घोरपडे..................................................९८

१८. आपुलकीचा सांगावा : विजया हिरेमठ.............................................................१०१

# नव्या कथेचा 'सांगावा'

- प्राचार्य डॉ. सयाजीराजे मोकाशी.

भारतातील बहुसंख्य लोक खेड्यातून राहतात. 'निसर्गाकडे चला' या महात्मा गांधींच्या आवाहनास प्रतिसाद देऊन अनेक शहरवासी लोक निसर्गाकडे वळाले. खेड्यातील खूप मोठे जग अजूनही साहित्याचा विषय झाले नव्हते तेथील शेती, निसर्ग, जीवन पद्धती त्यातून आकारास आलेली समाजरचना आणि त्यात पिढ्यांनपिढ्या जीवन जगणारा माणूस साहित्याच्या केंद्रस्थानी आला आणि ग्रामीण साहित्य उदयास आले.

स्वातंत्र्य प्राप्तीसाठी सुरू असलेली देशव्यापी चळवळ आणि ग्रामीण भागातील शिक्षण प्रसार यामुळे देशभर समाज जागृती होऊ लागली. स्वातंत्र्यानंतर व्यक्ती स्वातंत्र्याला महत्त्व आले. राज्य घटनेने जन सामान्यांना मोठेपणा, सन्मान बहाल केला. यातूनच ग्रामीण साहित्याच्या निर्मितीला मोठा आधार प्राप्त झाला. हरिभाऊ आपटे, वि. स. सुखटणकर, लक्ष्मणराव सरदेसाई, ग. ल. ठोकळ, ग. ह. पाटील, बहीणाबाई चौधरी, व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील, आनंद यादव, रा. रं. बोराडे, द. ता. भोसले, चारूतासागर, भास्कर चंदनशिव इ. लेखकांचे ग्रामीण साहित्य सुप्रतिष्ठीत झाले. निसर्ग, कृषीनिष्ठा, गावगाडा, ग्रामीण बोली, ग्रामीण कुटुंब व्यवस्था, ग्रामसंस्कृती, आदीमतेकडे झुकणारा कल आणि प्रादेशिक बोली ही ग्रामीण साहित्याची वैशिष्ट्ये सांगितली जातात.

स्वराज्यप्राप्ती नंतर लोकशाही जीवनात खूप मोठे बदल घडले. शेतीचे

आधुनिकिकरण, शिक्षणाचा वाढता प्रसार, सरकारी योजनांची घोषणा, कर्जमाफी, मानवी मूल्यांची मोडतोड, यंत्र युगातील मानवाचे क्षुद्रत्व, वाढत गेलेला दुष्काळ, नैसर्गिक आपत्ती, पैसा व गुंडगिरीची मदत घेऊन लढलेल्या निवडणुका आणि बदलत्या मानसिकतेमुळे कर्जबाजारीपण यामुळे पारतंत्र्य आपल्या दाराशी आलेले जाणवते.

ही बदलती ग्रामीण व्यवस्था साहित्यातून जाणवते. गेल्या पन्नास-साठ वर्षात ग्रामीण कथेत विविध प्रवृत्ती दिसून येतात, असे डॉ. कृष्णा इंगोले म्हणतात.

१) वास्तव परिस्थितीच्या संदर्भात ग्रामीण जीवनाचे चित्रण करणारी प्रवृत्ती.

२) ग्रामीण माणसांच्या मनांचा आणि नाते संबंधांचा शोध घेणारी प्रवृत्ती.

३) दलित, भटक्यांच्या जीवनानुभवांचे चित्रण करणारी प्रवृत्ती.

४) मनोरंजनात्मक विनोदी किस्सा प्रवृत्ती.

ग्रामीण जीवनाचे चित्रण करणाऱ्या प्रवृत्तीमध्ये पुढील विशेष जाणवतात. आपल्या प्रदेशाचे, जीवनानुभवांचे, लोकजीवन परंपरेचे आणि बोलीचे वेगळेपण स्पष्टपणे जाणवते. पारंपरिक खेड्याचा होत गेलेला बदल व्यक्त होतो. व्यक्तीच्या मनोदर्शना बरोबरच सामाजिक, आर्थिक, राजकीय परिस्थितीच्या चित्रणावर लेखकाचा भर असतो. त्यात दुःख, दैन्य, दारिद्र्य, शोषण आणि विद्रोह प्रगटतो. निवेदनासाठी प्रमाणभाषा आणि संवादात बोलीभाषा व्यक्त होते. यामध्ये प्रामुख्याने व्यंकटेश माडगूळकर, मधु मंगेश कर्णिक, रणजित देसाई, बी. रघुनाथ, बाबा पाटील, चंद्रकुमार नलगे, चारूता सागर, आनंद यादव, द. ता. भोसले, बा. ग. केसकर, भास्कर चंदनशिव, राजन गवस, सोपान हळमकर यांचा समावेश होतो.

या प्रकारातील कथांत व्यक्तीरेखांना उठाव देण्यासाठी प्रदेश आकार धारण करीत नाही. तर समृद्ध जीवनानुभवातून त्या प्रदेशाची रेषन् रेष लेखक प्रभावीपणे शब्दात आणतो. बदलती मानवी प्रवृत्ती, मूल्यांची पायमल्ली आणि नातेसंबंधातील मनोविश्लेषण वास्तवाच्या पातळीवर, बोलीच्या सहज वापरातून साजिवंतपणे हा अनुभव वाचकांच्या अंतःकरणाला भिडतो. याच जात-कुळीतील अस्सल नवकथाकार सचिन पाटील हे एक होत. त्यांच्या 'सांगावा' या कथासंग्रहाचा हा थोडक्यात परामर्श.

सचिन पाटील यांच्या कथा ग्रामजीवनातील वास्तवाचे प्रत्ययकारी चित्रण

इत्यादी वाकसंप्रदाय, प्रतिभा रचनेचे सौष्ठव लेखणीतून स्पष्ट करताना दिसतात.

त्यांची कथा निवेदनाप्रमाणेच संवादातून गती घेताना दिसते. त्यामुळे आशयाला संपन्नता येते. भाषेचा मुक्त आविष्कार कथेला लय प्राप्त करून देतो.

असे असले तरी त्यांच्या कथामध्ये काही मर्यादाही जाणवतात. कथाकार दमदार कथाबिजे शोधतात आणि लिहितात. परंतु हुबेहुब उभा केलेल्या प्रसंग निर्मितीचा फायदा कथेला होत नाही. कथा सूचकतेने ते मांडत नाही. त्यामुळे काही ठिकाणी विसंगती वाटते.

तरीही प्रभावी प्रसंग निर्मिती, कथांचे प्रसंगानुरूप प्रभावी प्रारंभ व ताकदीचे शेवट, समकालातील नव्या आशयाच्या दमदार कथा, व्यक्ती दर्शनासाठी ग्रामीण जीवनाचा चपखल वापर, कथा आशयाला अभिव्यक्त करणारी कमावलेली भाषा आणि जैनी बोलीचा आशयानुरूप वापर हे कथेला एका उंचीवर नेतात.

जो कथाकार गेली काही वर्षे अंथरूणावर पडून जिद्दीने अनुभव संपन्न कथा लिहितो. आघातातही पुन्हा सावरतो, हातात लेखणी घेतो आणि सशक्त धडधाकट माणूस नावाच्या वाचकाला स्तिमीत करतो, यातच त्यांच्या कथेचे मोठेपण सामावलेले आहे, त्यांच्या कथेतील दोष सामान्य आहेत. मुळातच कथाकाराची कथा पाटील कुळातील असून, तिला खानदानी ऐट आहे, शालिनता आहे आणि अनुभवांचा जोरकसपणाही आहे. हा जोरकसपणा भविष्यातील मराठी कथेला संपन्नतेच्या उंचीवर नेईल यात शंका नाही.

त्यांच्या मूळच्याच दमदार वाटचालीला माझ्या हार्दिक शुभेच्छा!

(पूर्वप्रसिद्धी : त्रैमासिक तिफन)

* * *


**- डॉ. सयाजीराजे मोकाशी,**

प्राचार्य मायणी महाविद्यालय,

मोबा. ९९२२४२१५९५.

अवकाळी विळखा

# शेतकरी वेदनेचा हुंकार




संपादन

**राजेंद्र शंकर गवळी**

# अंतरंग


* ग्रामीण जीवनाचा वेध घेणारी कथा : अवकाळी विळखा
– उमेश मोहिते....................................................११
* ग्रामीण जीवनातील समकालीन वास्तव व समस्यांचा समग्र आढावा :
अवकाळी विळखा – डॉ. राहुल अशोक पाटील..........................१६
* अवकाळी विळखा : कृषी वेदनेचा संपन्न आविष्कार
– डॉ. सयाजीराजे मोकाशी..............................................२३
* अक्षरांचे अक्षय देणे : अवकाळी विळखा – सरिता पवार..............२९
* अवकाळी विळखा : शेतकरी वेदनेचा हुंकार – हिंमत पाटील...........३५
* वर्तुळाबाहेरील कथा : अवकाळी विळखा – रंगराव बापू पाटील.......४१
* ग्रामजीवनाचे वास्तव : अवकाळी विळखा – राजेंद्र भोसले............४५
* बळीराजाला पडलेला : अवकाळी विळखा – विजय कापडी...........५१
* एक आश्वासक ग्रामीण कथासंग्रह : अवकाळी विळखा– संदीप नाझरे..५४
* मातीतल्या नात्यांना सावरणारा कथासंग्रह : अवकाळी विळखा
– सुनील जवंजाळ ....................................................६१
* व्यथा बळीराजाची : अवकाळी विळखा – आनंदा टकले..............६४
* शेतकऱ्यांच्या काळीज व्यथा : अवकाळी विळखा– महादेव बुरूटे......६८
* काळावर आसूड ओढणाऱ्या कथा : अवकाळी विळखा
– हरिश्चंद्र पाटील....................................................७१
* व्यथा शेतकऱ्यांच्या : अवकाळी विळखा– प्रा. बाबासाहेब देविकर....७७
* कृषीमनाच्या कोंडमाऱ्याचा प्रभावी वेदनाविष्कार
– डॉ. सयाजीराजे मोकाशी..............................................८६
* 'अवकाळी विळखा' मधील स्त्री सहनायिका – कल्पना पाटील........९१
* शेतकऱ्यांच्या व्यथा मांडणाऱ्या कथा : अवकाळी विळखा
– डॉ. अजित पुरोहित..................................................९७

# घुसमट : कृषीमनाच्या कोंडमाऱ्याचा प्रभावी वेदनाविष्कार

– डॉ. सयाजीराजे मोकाशी.

**म**हानगरे वाढताना ती शेजारी असणाऱ्या जवळ असणाऱ्या खेड्यांच्या नरड्यावर पाय देतात. तेथील ग्रामसंस्कृती, रितीरिवाज, परंपरा यांना सुरूंग लावतात. शहरे फोफावताना ती सर्वप्रथम शहरालगतच्या गरीब शेतकऱ्यांच्या जमीनी कवडी मोलाने बळकवतात. पिढ्यान् पिढ्या घाम गाळणाऱ्या शेतकऱ्यांना हाताला धरून बांधाबाहेर काढतात. भूमिहीन बनवतात.

कालांतराने त्याच शहरातील फुटपाथवरचे जगणे त्यांच्या वाटणीला येते. चकचकीत रस्त्यांच्या झगमगाटी बाजारी दुनियेत या शेतकऱ्यांचे कष्टकऱ्यांचे अन् शेतमजुरांचे नेमके पुढे काय होते? याचे उत्तर येणाऱ्या काळाच्या उदरात दडलेले असते. एवढेच मात्र खरे! या दृष्टीने श्री. सचिन वसंत पाटील यांच्या 'अवकाळी विळखा' या कथासंग्रहातील 'घुसमट' या कथेचा थोडक्यात परामर्श घ्यावयाचा आहे.

सतराशे साठ पिढ्यातील परंपरेत असणारा, दर पावलाला मनाची घुसमट अनुभवणारा विलास हा नव्या काळातील पदवीधर शेतकरी आहे. आजोबा वडील स्वत: अन् त्याचा मुलगा या बदलत्या पिढ्यांची मानसिकता कथाकार नोंदवितात. शेतावर चाळीस हजाराचे कर्ज काढून बजाजची प्लॅटीना गाडी घेण्याचा हट्ट करणारा मुलगा अन् रोजचा खर्च कसा भागवायचा या विचारात पडलेला विलास ही दोन भिन्न टोके कथेत संघर्ष निर्माण करतात. पैसे नसल्यामुळे सायकलचे मोडके चाक बदलता येत नाही. मुलीच्या लग्नासाठी काढलेले कर्ज भागविताना विलासची दमछाक होते. आपल्या असंख्य पिढ्या शेतात राबल्या पण घर तेच राहिले, डोईवर कर्ज तसेच राहिल्यामुळे कौलाखालची जुनी आढी तीच राहिली. शेतीला भांडवल नाही. खायला प्यायला चांगले नाही. पोटाची समजूत घालून येणारा दिवस ढकलणे सुरू आहे. विलासला पोराचा राग येतो. रान विकायचे पाप आपण करायचे नाही, असे त्याला वाटते पण दुसऱ्या बाजूने पाहिले तर त्याला वाटते, आपल्या आयुष्याची जी माती झाली, तशी आबदा आपल्या लेकरा बाळांची होऊ नये यासाठी याचा जीव तडफडतो.

भारतीय शेतकरी आपल्या कष्टाबरोबर तो थोडा अधिक दैववादी आहे.

# पटकथा लेखन

डॉ. रंजना नेमाडे



## अनुक्रमणिका

प्रस्तावना / ५

मनोगत / ८

प्रकरण १ ले

पटकथा आणि इतर वाङ्मय प्रकार / ११

प्रकरण २ रे

पटकथालेखनाची पूर्वतयारी/ १९

प्रकरण ३ रे

यंत्राची ओळख/ २५

प्रकरण ४ थे

पंधरा ऑगस्ट/३२

प्रकरण ५ वे

पंधरा ऑगस्टची पटकथा /४१

प्रकरण ६ वे

पटकथेत रूपांतर करताना/६२

पारिभाषिक शब्द / ६९

संदर्भग्रंथ / ७१

प्रकरण ४ थे

# पंधरा ऑगस्ट

डॉ. सयाजीराजे मोकाशी

बघता बघता दिवस कलला, उन्हाचा जोर कमी झाला. हळूहळू मावळतीला आभाळ गोळा होऊन अंधारून येऊ लागलं. एवढ्यात शाळेची घंटा होऊन कोंडवाड्यातून वासरं बाहेर पडावीत तशी पोरं बाहेर पडली. मोकळी होऊन दप्तर उचलून घराच्या वाटंला लागली. मागोमाग गुरूजींनीही न चुकता घरचा रस्ता धरला. पोरांच्या गोमकाल्यातून त्यांनीही आपली सुटका करून घेतली. शाळा सुटल्यानं अन् सुसाट पळणाऱ्या पोरांच्या दंग्यामुळे गावभर चैतन्य निर्माण झालं. जवळच्या रस्त्यानं लवकर घरी जाण्याची घाई त्याना झाली होती. रानामाळात घरी जाणारी पोरं पाठमोरी बघत वस्तीच्या वाटंला लागली. अंधाराआधी घरी गेलं पाहिजे, म्हणून ती गडबडीने वाट तुडवित होती. नुकताच पाचवीत गेलेला दिगू अन् त्याच्या मागं चालणारी तिसरीत शिकणारी त्याची बहीण सावित्री एकामागं एक वस्तीवर आली. त्यांनी दप्तरं उंबऱ्यातच ठेवली. दिगूनं हात मागं सारून रांजणातनं पाणी घेऊन हात धुतला. 'आय मला भूक लागलिया जेवाय वाढ'. असं म्हणत घरात शिरला.

शिवा नुकताच वैरणीचा भारा घेऊन आला होता. त्यानं भारा खाली टाकून त्यालाच तो टेकून बसला होता. आंगावरचं वैरणीचं पाल झाडून त्यानं खिशात हात घातला. तंबाखू तळहातावर घेतली. त्यातली काटकं कुटकं बाजूला करून चुना घेऊन तंबाखू मळू लागला. तसा दिगू तेल लावलेली बाजरीची भाकरी हातात घेऊन, तोडून खात बाहेर आला. शिवाजवळ तो येऊन बसला आणि अचानक आठवून तो म्हणाला.

''अण्णा''


''काय?''

''शुक्रवारी पंदरा आगस्ट हाय''

''बरं मग?''

# अवकाळी विळखा

# शेतकरी वेदनेचा हुंकार




12

संपादन

**राजेंद्र शंकर गवळी**

# अंतरंग

* ग्रामीण जीवनाचा वेध घेणारी कथा : अवकाळी विळखा
– उमेश मोहिते........................................११
* ग्रामीण जीवनातील समकालीन वास्तव व समस्यांचा समग्र आढावा :
अवकाळी विळखा – डॉ. राहुल अशोक पाटील........................१६
* अवकाळी विळखा : कृषी वेदनेचा संपन्न आविष्कार
– डॉ. सयाजीराजे मोकाशी........................................२३
* अक्षरांचे अक्षय देणे : अवकाळी विळखा – सरिता पवार..............२९
* अवकाळी विळखा : शेतकरी वेदनेचा हुंकार – हिंमत पाटील...........३५
* वर्तुळाबाहेरील कथा : अवकाळी विळखा – रंगराव बापू पाटील.......४१
* ग्रामजीवनाचे वास्तव : अवकाळी विळखा – राजेंद्र भोसले............४५
* बळीराजाला पडलेला : अवकाळी विळखा – विजय कापडी...........५१
* एक आश्वासक ग्रामीण कथासंग्रह : अवकाळी विळखा– संदीप नाझरे..५४
* मातीतल्या नात्यांना सावरणारा कथासंग्रह : अवकाळी विळखा
– सुनील जवंजाळ ........................................६१
* व्यथा बळीराजाची : अवकाळी विळखा – आनंदा टकले...............६४
* शेतकऱ्यांच्या काळीज व्यथा : अवकाळी विळखा– महादेव बुरूटे......६८
* काळावर आसूड ओढणाऱ्या कथा : अवकाळी विळखा
– हरिश्चंद्र पाटील........................................७१
* व्यथा शेतकऱ्यांच्या : अवकाळी विळखा– प्रा. बाबासाहेब देविकर....७७
* कृषीमनाच्या कोंडमाऱ्याचा प्रभावी वेदनाविष्कार
– डॉ. सयाजीराजे मोकाशी........................................८६
* 'अवकाळी विळखा' मधील स्त्री सहनायिका – कल्पना पाटील.........९२
* शेतकऱ्यांच्या व्यथा मांडणाऱ्या कथा : अवकाळी विळखा
– डॉ. अजित पुरोहित........................................९७

## घुसमट : कृषीमनाच्या कोंडमाऱ्याचा प्रभावी वेदनाविष्कार

– डॉ. सयाजीराजे मोकाशी.

**म**हानगरे वाढताना ती शेजारी असणाऱ्या जवळ असणाऱ्या खेड्यांच्या नरड्यावर पाय देतात. तेथील ग्रामसंस्कृती, रितीरिवाज, परंपरा यांना सुरूंग लावतात. शहरे फोफावताना ती सर्वप्रथम शहरालगतच्या गरीब शेतकऱ्यांच्या जमीनी कवडी मोलाने बळकवतात. पिढ्यान् पिढ्या घाम गाळणाऱ्या शेतकऱ्यांना हाताला धरून बांधाबाहेर काढतात. भूमिहीन बनवतात.

कालांतराने त्याच शहरातील फुटपाथवरचे जगणे त्यांच्या वाटणीला येते. चकचकीत रस्त्यांच्या झगमगाटी बाजारी दुनियेत या शेतकऱ्यांचे कष्टकऱ्यांचे अन् शेतमजुरांचे नेमके पुढे काय होते? याचे उत्तर येणाऱ्या काळाच्या उदरात दडलेले असते. एवढेच मात्र खरे! या दृष्टीने श्री. सचिन वसंत पाटील यांच्या 'अवकाळी विळखा' या कथासंग्रहातील 'घुसमट' या कथेचा थोडक्यात परामर्श घ्यावयाचा आहे.

सतराशे साठ पिढ्यातील परंपरेत असणारा, दर पावलाला मनाची घुसमट अनुभवणारा विलास हा नव्या काळातील पदवीधर शेतकरी आहे. आजोबा वडील स्वत: अन् त्याचा मुलगा या बदलत्या पिढ्यांची मानसिकता कथाकार नोंदवितात. शेतावर चाळीस हजाराचे कर्ज काढून बजाजची प्लॅटीना गाडी घेण्याचा हट्ट करणारा मुलगा अन् रोजचा खर्च कसा भागवायचा या विचारात पडलेला विलास ही दोन भिन्न टोके कथेत संघर्ष निर्माण करतात. पैसे नसल्यामुळे सायकलचे मोडके चाक बदलता येत नाही. मुलीच्या लग्नासाठी काढलेले कर्ज भागविताना विलासची दमछाक होते. आपल्या असंख्य पिढ्या शेतात राबल्या पण घर तेच राहिले, डोईवर कर्ज तसेच राहिल्यामुळे कौलाखालची जुनी आडी तीच राहिली. शेतीला भांडवल नाही. खायला प्यायला चांगले नाही. पोटाची समजूत घालून येणारा दिवस ढकलणे सुरू आहे. विलासला पोराचा राग येतो. रान विकायचे पाप आपण करायचे नाही, असे त्याला वाटते पण दुसऱ्या बाजूने पाहिले तर त्याला वाटते, आपल्या आयुष्याची जी माती झाली, तशी आबदा आपल्या लेकरा बाळांची होऊ नये यासाठी याचा जीव तडफडतो.

भारतीय शेतकरी आपल्या कष्टाबरोबर तो थोडा अधिक दैववादी आहे.